SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004, MAHARASHTRA
PHONE : EPABX – 2609000, www.unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४, महाराष्ट्र
दूरध्वनी - ईपीएबीएक्स - २६०९०००
Meeting & Elections Section
Phone No. – (0231) 2609130
Email ID :- meeting@unishivaji.ac.in

Estd. 1962
"A++" Accredited by NAAC(2021)
With CGPA 3.52

क्रमांक: शिवाजी वि./निवडणूक/२२/ No 0 0 5 5 4 दिनांक 16 JUN 2022

अधिसूचना

नोंदणीकृत पदवीधर नोंदणी व नोंदणीकृत पदवीधर मतदार नोंदणी करण्याविषयी

या अधिसूचनेद्वारे संबंधितांना सूचित करण्यात येते की,

१. सन २०२२ मध्ये होणाऱ्या अधिसभेच्या नोंदणीकृत पदवीधर निर्वाचक गणासाठी होणाऱ्या निवडणूकीसाठी, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम,२०१६ कलम १३१, महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने दिनांक १७ मे,२०१७ रोजीच्या अधिसूचनेद्वारे निर्गमित केलेल्या एकरूप परिनियम क्रमांक २ मधील शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर विद्यापीठाच्या नवीन पदवीधरांकडून नोंदणीकृत पदवीधर नोंदणी व नोंदणीकृत पदवीधर मतदार नोंदणी करण्याकरिता व ज्या पदवीधरांची नावे विद्यापीठाच्या नोंदणीकृत पदवीधरांच्या नोंदवहीत आहेत, त्यांचे कडून नोंदणीकृत पदवीधर मतदार नोंदणी करण्याकरिता विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावर University Election २०२२ या पोर्टलवर उपलब्ध असलेल्या ऑनलाईन प्रणालीने दिनांक ३० जून, २०२२ पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहेत.

२. विद्यापीठाच्या संकेतस्थळावर नोंदणीकृत पदवीधरांच्या यापूर्वी नोंदणी केलेली नोंदवही (यादी) ठेवण्यात आलेल्या आहे. सदर यादीमध्ये ज्या पदवीधरांची नावे आहेत, त्यांनी प्रथम त्यांचे नाव शोधून नोंदणीकृत पदवीधर मतदार नोंदणी अर्ज भरावा.

३. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या नवीन पदवीधरांची नोंदणीकृत पदवीधर नोंदणी व नोंदणीकृत पदवीधर मतदार नोंदणी एकाच अर्जाद्वारे करण्यात येत आहे.

४. नोंदणीकृत पदवीधर नोंदणीसाठी रूपये २०/- इतके शुल्क ऑनलाईन माध्यमातुन भरून त्याची पावती अर्जासोबत जोडण्यात यावी. तर नोंदणीकृत पदवीधर मतदार नोंदणीसाठी कोणतेही शुल्क भरण्याची आवश्यकता नाही.

५. संकेतस्थळावर ऑनलाईन माध्यमातुन अर्ज भरल्यानंतर त्या अर्जाची A-४ साईज कागदावर प्रिंट घेऊन त्यावर स्वाक्षरी करून खालील नमूद कागदपत्रांच्या स्वसांक्षाकित प्रती व शुल्क भरलेली पावती जोडून **मा.कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर-४१६००४** यांचे नावे पोष्टाने किंवा समक्ष **खोली क्र.१३८, आवक विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर-४१६००४ येथे दिनांक ५ जूलै,२०२२ रोजी सांयकाळी ६.०० वाजेपर्यंत जमा करावेत.**

६. **अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे-**

अ) पदवी प्रमाणपत्राची स्वसांक्षाकित प्रत

ब) निवासाचा पुरावा (आधार कार्ड, निवडणूक ओळख पत्र, शिधापत्रिका, पारपत्र, विद्युत वापर देयक, वाहन चालन परवाना) यापैकी एक

क) शुल्क भरलेली पावती

७. ज्यांच्या पदवी प्रमाणपत्रावरिल व निवासाच्या पुराव्यावरिल नावामध्ये बदल असेल त्यांनी अर्जासोबत विवाह नोंदणी प्रमाणपत्र/शासन राजपत्र/ पॅन कार्ड यापैकी एका कागदपत्राची प्रत स्वसांक्षाकित करून अर्जासोबत जोडावी.

८. नोंदणी अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकानंतर सर्व अर्जांची छानणी करून पात्र नोंदणीकृत पदवीधर मतदार यादी विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

९. नोंदणीकृत पदवीधर मतदार यादीमध्ये ज्या पदवीधरांचे नाव असेल त्यानांच अधिसभेच्या नोंदणीकृत पदवीधर निर्वाचक गणासाठी होणाऱ्या निवडणूकीसाठी मतदान करता येईल.

१०. विहीत मुदतीनंतर प्राप्त झालेले व अपूर्ण अर्ज कोणत्याही परिस्थितीत स्विकारले जाणार नाहीत.

डॉ.व्ही.एन.शिंदे

प्रभारी कुलसचिव तथा

निवडणूक निर्णय अधिकारी

प्रत- माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी

१.मा.अधिविभागप्रमुख, शिवाजी विद्यापीठ सर्व अधिविभाग

२.मा. प्राचार्य, शिवाजी विद्यापीठ संलग्नित सर्व महाविद्यालये